CNR No.MHST120000492025

दाखल तारीख: १०/०१/२०२५
नोंदणी तारीख: १६/०१/२०२५
निकाल तारीख: ०९/०६/२०२६
कालावधी : वर्षे महिने दिवस
०१ ०५ २३

# म्हसवड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, म्हसवड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी **: श्रीमती.एस.एस.साळुंखे**)

नियमित दिवाणी दावा क्र. २८/२०२५ निशाणी क्र. २०

**<u>वादी</u>** :
१) वंदना लहू यादव
वय– ५० वर्ष, धंदा – घरकाम
२) सचिन लहू यादव
वय–३१ वर्ष, धंदा–शेती / नोकरी
३) स्वाती लहू यादव
वय–२६ वर्ष, धंदा–घरकाम
सर्व रा. वरकुटे–मलवडी ता. माण जि. सातारा

**विरूध्द**

**<u>प्रतिवादी</u>** :
१) साहेबराव श्रीपती यादव
वय–६३ वर्ष, धंदा– शेती
२) अंकुश श्रीपती यादव
वय–५८ वर्ष, धंदा– शेती
प्रतिवादी क्र. १ व २ रा. वरकुटे–मलवडी ता. माण जि. सातारा
३) आशा विश्वनाथ साठे
वय–६० वर्ष, धंदा– घरकाम

रा. रुम नं. ४०२, चौथा मजला शिवाजी बिल्डींग,
बदलापुर, मुंबई

४) लता सदाशिव रास्ते,
वय–५८ वर्ष, धंदा– घरकाम

५) नंदा विठ्ठल तुपे,
वय–५० वर्ष, धंदा– घरकाम

६) छाया शशिकांत सकट,
वय–३५ वर्ष, धंदा– घरकाम
प्रतिवादी क्र. ४ ते ६ रा. प्रियदर्शनी चाळ, कमिटी
समोर, १०४ महात्मा फुले संघ, रमाबाई आंबेडकरनगर
घाटकोप, मुंबई

७) सुभद्रा दादासाहेब तुपे
वय–३२ वर्ष, धंदा– घरकाम
रा.भिकवडी बु. ता. खानापुर जि. सांगली

८) सुनिल विठ्ठल तुपे
वय–३० वर्ष, धंदा– नोकरी
रा. शिवाजी नगर, म्हाडा कॉलनी, चेंबूर

..........................................................................................................................

| | |
|---|---|
| वादींतर्फे विधिज्ञ | – श्री.एम.बी.बळे, विद्वान वकील |
| प्रतिवादी क्र. १ ते ८ | – एकतर्फा |

..........................................................................................................................

## **न्यायनिर्णय**

(ता. ०९/०६/२०२६ रोजी घोषित केला)

वादी यांनी सदरचा दावा हा दावा मिळकतीमधील वादींचा १/४ हिस्सा कायद्याने येणारा हिस्सा अलग व तुटक, पृथक करुन देणेसाठी व दावा मिळकतीचे वाटप मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत होवून मिळावे म्हणून दाखल केलेला आहे.

२) वादी यांनी आपल्या दाव्यामध्ये कथन केलेले आहे की, दावा मिळकत ही मौजे वरकुटे–मलवडी, ता. माण, जि. सातारा येथील असून त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **गट नंब** | **क्षेत्र हे.आर** | **आकार रु.पै** | **हिस्सा** |
|---|---|---|---|---|
| १ | ४२२ | १२.७९ | ०४.१८ | ०.९२.४९ आर<br>पो.ख. ०.१४.०८ |
| २ | ९२ | ०.५५ | २.०० | संपूर्ण |
| ३ | ९३ | ०.०५ | ०.०९ | ०.०२.००<br>पो.ख. ०.०१.३३ |

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकत ही या दाव्याचा वादविषय असून यापुढे सोयीसाठी दावा मिळकत असे संबोधले आहे.

३) वादी यांनी असे कथन केले आहे की, मयत श्रीपती कोंडीबा यादव यास आक्काताई, साहेबराव, अंकुश, लहु हे वारस असून त्यापैकी मयत अक्काताई हिस मयत वारस म्हणून प्रतिवादी क्र.३ आशा, प्रतिवादी क्र. ४ लता, प्रतिवादी क्र. ५ नंदा, प्रतिवादी क्र. ६ छाया, मयत दादासाहेब यास त्याची पत्नी प्रतिवादी क्र. ७ सुभद्रा, प्रतिवादी क्र. ८ सुनिल, मयत लहु यास वारस वादी क्र. १ वंदना, वादी क्र. २ सचिन, वादी क्र. ३ स्वाती असे वारस आहेत.

४) वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी यांचे हिंदु एकत्र कुटूंब असून त्यांचे दरम्यान अद्याप दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही. वादी, प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार श्रीपती यांचे मृत्यूपश्चात प्रतिवादी क्र. १ ची नोंद कुटूंबकर्ता म्हणून झाली होती. वास्तविक वादी, प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांचे मृत्यूपश्चात दावा मिळतीस वादी,

प्रतिवादी यांची समाईकात नोंद होती व आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ यांची नोंद कुटूंबकर्ता म्हणून असलेने त्याचा गैरफायदा घेवून तो दावा मिळकतीमधील समभाग या वादींचे संमतीशिवाय विक्री करणेची भाषा करत आहे.

५) वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी क्र. १ ते ३ चे पुर्वहक्कदार लहू श्रीपती यादव हे दि. १६/०८/२०२० रोजी मयत झाले असून त्यांना वादी क्र. १ ते ३ शिवाय अन्य कोणीही वारस नाही. सप्टेंबर २०२४ मध्ये वादी हिला महाराष्ट्र शासनाचे प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेअंतर्गत घरकूल मंजूर करणेत आले होते परंतु घरकूल बांधणेकरीता दावा मिळकतीपैकी गट नं. ९२ येथे घर बांधकाम करणेकरीता वादींनी प्रतिवादी क्र. १ कडे विचारणा केली असता प्रतिवादी क्र. १ ने त्यास हरकत केली या दरम्यान वादींनी प्रतिवादीस दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करुन मागितले असता प्रतिवादी क्र. १ ने त्यास नकार दिला म्हणून सदरचा दावा दाखल केलेला आहे.

६) सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. १ यांना नि. क्र. १० प्रमाणे समन्स तामील झाले. तसेच प्रतिवादी क्र. २ ते ८ हे नि. १६ प्रमाणे दाव्यात सामील झाले परंतु त्यांनी आजतागायत लेखी कैफियत अथवा म्हणणे दाखल केलेले नाही म्हणून प्रतिवादी क्र. १ विरुध्द दि. २७/०६/२०२५ रोजी व प्रतिवादी क्र. २ ते ८ विरुध्द दि. ०२/०९/२०२५ रोजी दावा विना म्हणणे चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

७) वादी पक्षातर्फे विधिज्ञ श्री. एम.बी.बळे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. मी दाव्यातील विषयाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित करुन त्यावरील माझे निष्कर्ष पुढील कारणांकरीता प्रत्येक मुद्दांचे समोर लिहिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १) | वादी क्र. १ ते ३ हे दावा मिळकत त्यांची व प्रतिवादी क्र. १ ते ८ यांची हिंदु एकत्र कुटूंबाची समाईक वहिवाटीतील मिळकत असल्याचे सिध्द करतात काय ? | ... | होकारार्थी |
| २) | वादी क्र. १ ते ३ हे दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा वाटणी होउन मिळणेस पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | ... | होकारार्थी. |
| ३) | काय खर्च, आदेश व हुकूमनामा ? | ... | दावा मंजूर करणेत येतो. |

**<u>कारणमिमांसा.</u>**

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u>**

८) वादीने सदरचा दावा हा त्यांचा वाद मिळकतीतील कायदेशिर हिस्सा वाटणी होवून मिळावा म्हणून दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. १ ते ८ हे समन्स तामील होउन दाव्यात हजर झाले परंतु त्यांनी आजतागायत लेखी कैफियत दाखल केलेली नाही. यावरुन वादींची दाव्यातील संपुर्ण कथने ही विना आव्हानित राहिलेली आहेत असे दिसून येते.

९) वादी क्र.३ हिने आपले दाव्यातील कथनांबाबत नि.क्र.१७ प्रमाणे तिचा पुरावा अभिलेखावर दाखल केला आहे. सदर पुराव्यामध्ये तिने तिच्या दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. प्रतिवादीने वादीचा उलटतपास न घेतल्याने प्रतिवादी क्र. १ ते ८ विरुध्द उलटतपास

नाहीचा आदेश दि. ०९/१२/२०२५ रोजी पारीत झालेला आहे. वादीने नि. १८ अन्वये पुरावा बंद केलेला आहे.

१०) वादी यांनी नि.क्र.३ सोबत मौजे वरकुटे मलवडी येथील गट नं. ९२ चा ७/१२ उता–याची ऑनलाईन प्रत, मौजे वरकुटे मलवडी ता. माण जि. सातारा येथील गट नं. ९३ चा ऑनलाईन उतारा, मौजे वरकुटे मलवडी येथील गट नं. ४२२ चा ७/१२ चा ऑनलाईन उतारा तसेच वादी क्र. १ वंदना लहू यादव यांना घरकुल योजना मंजूर झालेबाबतच्या पत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे.

११) वादीने दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यांचे अवलोकन केले असता दावा मिळकत गट नं. ४२२ क्षेत्र ९२.४९ आर पो. ख. ०.१४.०८ इतक्या क्षेत्रास सामाईक क्षेत्र म्हणून वादी व प्रतिवादी क्र. १, २ तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांचे पुर्वहक्कदार आक्काताई (आक्कुताई) विठ्ठल तुपे यांचे नावाची नोंद दिसून येते. तसेच दावा मिळकत गट नं. ९२ क्षेत्र ०.५५.०० आर इतक्या क्षेत्रास सामाईक क्षेत्र म्हणून वादी व प्रतिवादी क्र. १, २ तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांचे पुर्वहक्कदार आक्काताई (आक्कुताई) विठ्ठल तुपे यांचे नावाची नोंद दिसून येते. तसेच दावा मिळकत गट नं. ९३ क्षेत्र ०.०२ आर पो. ख. ०.०१.३३ इतक्या क्षेत्रास सामाईक क्षेत्र म्हणून वादी व प्रतिवादी क्र. १, २ तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांचे पुर्वहक्कदार आक्काताई (आक्कुताई) विठ्ठल तुपे यांचे नावाची नोंद दिसून येते.

१२) प्रतिवादी यांनी सदर दाव्यास कैफियत अथवा त्यांचा पुरावा दाखल न केल्याने वादीचा पुरावा विनाआव्हाणित राहिलेला आहे. दावा मिळकतीमधील वंशावळीवरुन व दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यांवरुन व वादीने शपथेवर दाखल केलेल्या पुराव्यावरुन वादी व

प्रतिवादी यांची दावा मिळकत ही हिंदु एकत्र कुटूंबाची व सामाईक वहिवाटीची मिळकत असल्याचे सिध्द होते. म्हणून मी मुद्दा क्रं. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २ करिता**

१३) मयत श्रीपती कोंडीबा यादव यास वारस प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांचे पुर्वहक्कदार आक्काताई (मयत), साहेबराव, अंकुश, लहु आहेत. यापैकी मयत लहू यांचे वादी क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे हिंदु वारस कायद्यानुसार वादी क्र. १ ते ३ यांना एकत्रात १/४ हिस्सा प्राप्त होतो. प्रतिवादी क्र. १ व २ यांना प्रत्येकी १/४ हिस्सा येतो. प्रतिवादी क्र. ३ ते ८ हे मयत आक्काताई हिचे वारस असल्याने त्यांना एकत्रात १/४ हिस्सा येतो. सबब, मुददा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देवून मुद्दा क्र. ३ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा दावा खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. वादी क्र. १ ते ३ यांचा दावा मिळकतीमध्ये एकत्रात १/४ हिस्सा आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांचा दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी १/४ हिस्सा आहे.

४. प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांचा दावा मिळकतीमध्ये एकत्रात १/४ हिस्सा आहे.

५. सदर हुकूमनामा वाटपाकामी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ प्रमाणे जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे पाठविणेत यावा.

६. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करणेत यावा.

(खुल्या न्यायालयात न्यायासनावरुन घोषित करण्यात आले.)

SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Digitally signed by SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Date: 2026.06.09 17:30:03 +0530

ता. ०९/०६/२०२६
म्हसवड

(एस. एस. साळुंखे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, म्हसवड

निशाणी क्र. २०

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | R.A. Tarange Stenographer |
| Name of Court | C.J.J.D.,Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 09/06/2026 |
| Order signed by the P.O. on | 09/06/2026 |
| Order uploaded on | 09/06/2026 |